**प्रतिवादीं तर्फे उलटतपास – श्री. के. जी. पाटील वकील.**

**३.** मी शेती व्यवसाय करतो. मी माझ्या वडिलांचा गट क्र.९६/७ चा ७/१२ उतारा आज सोबत आणलेला नाही. मी सदर मिळकत माझ्या वडिलांना भारतीय सैन्य विभागा कडून मिळाल्याचा आणि त्यावरती आम्ही घर बांधल्याचा पुरावा माझ्या शपथपत्रासोबत दाखल केलेला नाही.

**४.** मी दावा मिळकत वादीला शासनाकडून मिळाल्याची कागदपत्रे पाहिलेली नाहीत. साक्षीदार सांगतो, त्याने केवळ ७/१२ उतारा पाहिलेला आहे. मी त्या उता– यावरती वादीच्या नावावर किती क्षेत्र आहे ते पाहिले नव्हते. मी प्रतिवादींच्या नावावरती असलेल्या मिळकतीची कागदपत्रे पाहिलेली नाहीत.

**५.** वादी हा आंबाडे गावचा रहिवासी नाही. मला वादींना मिळालेल्या दावा मिळकतीचे सन २०१० साली झालेले वाटप रद्द झाल्याची ऐकीव माहिती आहे. शासनाने ते वाटप चुकीचे झालेले असल्यामुळे रद्द केल्याची मला ऐकीव माहिती आहे. मी आज साक्ष देण्यापूर्वी दावा मिळकतीचा ७/१२ उतारा पाहिला नाही. मी जेव्हा उतारा पाहिला होता तेव्हा त्यावरती वादी नाचणा व तिळाचे पिक घेत असल्याच्या नोंदी पाहिल्या नव्हत्या.

**६.** दावा मिळकतीचा गट क्र.९५/१ आहे. त्या जमिनीलगत आमची जमीन आहे. हे म्हणणे खरे नाही की, आमचा व प्रतिवादींचा शेतातून येण्या–जाण्यावरुन कायम शाब्दीक वाद होतो. माझ्या आईने प्रतिवादींच्या विरोधात या न्यायालयामध्ये तक्रार दाखल केलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी त्या तक्रारीमध्ये साक्षीदार आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्या रागामुळे मी आज प्रतिवादीं विरोधात साक्ष देत आहे.

**७.** हे म्हणणे खरे नाही की, मी शपथपत्र सादर करण्यापूर्वी पासून आमचा व प्रतिवादींचा हद्दीबाबत वाद आहे. मला दावा मिळकतीमधील किती क्षेत्र पडीक व किती क्षेत्र पिकाऊ आहे याबाबत सांगता येणार नाही. मला दावा मिळकतीबाबत थोडी थोडी माहिती आहे. मी वादींनी मदत मागितल्यामुळे साक्ष देण्यासाठी आलो आहे. हे म्हणणे खरे नाही की, मला कोणतीही वस्तूस्थिती माहित नसून मी आज खोटी साक्ष देत

आहे.

**उलट तपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृती,**

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

(आर. पी. थोरे)

दिनांक – ०८.०८.२०२५.

दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, आजरा.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते